# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ११८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## गणेशोत्सवाआधी खड्डे बुजवा! मनपांना उपमुख्यमंत्र्यांचे आदेश

**ठाणे :** खड्डेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व महानगरपालिकांनी तत्काळ कामाला लागावे. पावसाळ्यात तातडीने रस्ते बुजविण्यासाठी प्री कास्ट आणि जिओ पॉलिमर टेक्नो पॅच यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, तसेच शहरातील अंतर्गत रस्ते विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजवण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवावा असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बैठकीत दिले.

## भरत गोगावले, गिरीश महाजन नाशिक आणि रायगडचे पालकमंत्री

**मुंबई, १७ ऑगस्ट :** नाशिक आणि रायगड जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात गेल्या काही काळापासून रस्सीखेच सुरू होती. अखेर रायगडमध्ये शिवसेना शिंदे गटाने, तर नाशकात भाजपने बाजी मारली आहे. महायुतीमधील तीनही पक्षांचे स्थानिक नेते आपापल्या जिल्ह्यांत आपले वर्चस्व राहावे आणि निधीचे नियंत्रण मिळावे यासाठी आक्रमक होते.

# खुलताबाद दर्गा उरूस वादाच्या भोवऱ्यात; 2 कोटींच्या 'ठेक्यामुळे' 7 हजारांची दुकाने थेट लाखावर गेल्याने व्यापाऱ्यांचा संताप; उरूस यंदा बनला 'ठेक्याचा बाजार'

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**खुलताबाद :** गेल्या शेकडो वर्षांपासून अफाट श्रद्धा आणि परंपरेने भरणाऱ्या खुलताबादच्या प्रसिद्ध दर्गा मुन्तजीबोद्दीन झर झरी बक्ष यांच्या उरूसला यंदा भलत्याच कारणांमुळे ग्रहण लागले असून, उरूस मैदानावरील दुकानांच्या अव्वाच्या सव्वा वाढवलेल्या भाड्यामुळे सर्वसामान्य व्यापारी वर्ग अक्षरशः आर्थिक संकटात सापडला आहे. देशभरातून आणि परराज्यातून लाखो भाविक दर्शनासाठी येणाऱ्या या ऐतिहासिक जत्रेत छोट्या-मोठ्या व्यावसायिकांची मोठी रेलचेल असते, मात्र यंदा दर्गा कमिटी आणि उरूस व्यवस्था समितीच्या निर्णयामुळे व्यापारी वर्गात प्रचंड नाराजी आणि रोष पसरला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यंदाच्या उरूस मैदानावरील दुकानांचा ठेका तब्बल दोन कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेला एका खासगी व्यक्तीला देण्यात आल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, उरूस व्यवस्था समितीचे अध्यक्ष असलेल्या तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली हा ठेका दिल्याचे बोलले जात असून, ठेका मिळताच संबंधित व्यक्तीकडून मनमानी पद्धतीने वसुली सुरू करण्यात आली आहे. याआधीच्या वर्षांमध्ये दर्गा कमिटीकडून अवघ्या ७ ते १० हजार रुपये इतकी nominal फी घेऊन व्यापाऱ्यांना दुकानासाठी जागा उपलब्ध करून दिली जात



असे. याच माध्यमातून अनेक गोर-गरिब व्यापारी उरसाच्या २२ दिवसांच्या काळात किरकोळ व्यवसाय करून आपला संसार चालवत असत. परंतु, यंदा कंत्राटदाराने मनमानी करत एकाच दुकानाचे भाडे थेट १ लाख रुपयांपर्यंत नेऊन ठेपल्याने लहान व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत. या अवाजवी दरवाढीमुळे हवालदिल झालेल्या छोट्या व्यापाऱ्यांनी दुकाने घेण्यास स्पष्ट नकार दिला असून, सध्या उरूस मैदानात अनेक दुकाने रिकामी पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या व्यापाऱ्यांनी प्रशासनाविराधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. देशात आधीच बेरोजगारी आणि मंदीचे वातावरण असताना, उरूस-जत्रेत चार पैसे कमवून घर चालवणाऱ्या आमच्या पोटावर असा थेट पाय दिला जात असल्याची भावना एका संतप्त व्यापाऱ्याने व्यक्त केली आहे. वक्फच्या इनामी जमिनीवर भरणाऱ्या या पवित्र उरसाचे अशा प्रकारे व्यापारीकरण करणे कितपत योग्य आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शासकीय जागेचा असा अवाजवी ठेका खासगी व्यक्तीला देऊन सर्वसामान्यांची लूट चालवली असल्याचा आरोप होत असून, भरारी वाढवल्यामुळे दुकाने रिकामी राहिल्यास महसूल आणि भाविकांच्या सोयीसुविधांचे नुकसान कोण भरून काढणार, असा प्रश्नही चर्चिला जात आहे.

अनेक दशकांची जुनी परंपरा आणि भाईचाऱ्याचे प्रतीक असलेला हा उरूस यंदा मात्र 'ठेक्याचा बाजार' बनल्याची चर्चा शहरात रंगली आहे. तात्काळ हा वादग्रस्त ठेका रद्द करून जुनी आणि सुलभ व्यवस्था पूर्ववत लागू करावी, कारण वक्फच्या जमिनीवर सर्वप्रथम गरिब आणि होतकरू व्यापाऱ्यांचाच हक्क असायला हवा, अशी ठाम मागणी स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांनी केली आहे. आता या वाढत्या रोषाच्या पार्श्वभूमीवर शासन, प्रशासन आणि वक्फ बोर्ड या गंभीर अन्यायावर नेमकी काय भूमिका घेतात आणि कोणता निर्णय देतात, याकडे संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात वार्ता

### बिहारमधील अशोकधाम शिव मंदिरात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू

**पाटणा, 17 ऑगस्ट :** बिहारमधील लखीसराय जिल्ह्यातील अशोकधाम शिव मंदिरात श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आज झालेल्या चेंगराचेंगरीत सात भाविकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. प्रशासनाने अद्याप निश्चित आकडा जाहीर केलेला नाही. जिल्हाधिकारी शैलेंद्र कुमार यांनी माध्यमांना सुमारे सात भाविकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे. त्यांनी सांगितले की, अनेक भाविक जखमी झाले आहेत. मृतांमध्ये सर्व महिला असल्याचे सांगण्यात आले आहे.

सुमारे 55 हजार भाविक जलाभिषेक करण्यासाठी येथे पोहोचले होते, असे सांगण्यात आले आहे. याचदरम्यान चेंगराचेंगरी झाली. भाविक इकडे-तिकडे पळू लागले. यावेळी अनेक भाविक एकमेकांच्या खाली दबले गेले. प्रशासनाचे पथक बचावकार्य राबवत आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आतापर्यंत ज्या मृतांची ओळख पटली आहे, त्यामध्ये मधुबाला देवी (पती निरंजन कुमार सिंह, बडहिया), मनमाला देवी (पती निरंजन कुमार, बडहिया), रिंकू देवी (पती नीरज यादव, सफिया सराय मुंगेर), हेमलता देवी (पती सुरेंद्र यादव, प्रतापपूर, हलसी, लखीसराय) यांचा समावेश आहे. जखमींमध्ये सात महिलांचा समावेश आहे. त्यामध्ये मौसम कुमारी (वडील ललन राम, लक्ष्मीपूर), मुस्कान कुमारी (ललन राम, विद्यापीठ चौक), ममता देवी (पती धारो यादव, चननिया, लखीसराय), विमला देवी (पती विनोद राम, मोकामा), रीना कुमारी (पती राजेश सिंह, बभंगामा, लखीसराय), शिवानी कुमारी (वडील रामेश्वर राम, फरीदाबाद, लखीसराय), कबीला देवी (बाढ) यांचा समावेश आहे.

### हॉटेलला आग; सहा भाविकांचा मृत्यू, अनेक जखमी

**कोलकाता, 17 ऑगस्ट :** पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातील तारापीठ मंदिरासमोर असलेल्या एका हॉटेलमध्ये सोमवारी पहाटे लागलेल्या आगीत किमान सहा भाविकांचा मृत्यू झाला असून, अन्य अनेक जण भाजले आहेत. या सर्वांना रामपूरहाट मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींची प्रकृती पाहता मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तारापीठ पोलीस ठाण्यापासून काही अंतरावर असलेल्या पाच मजली 'बिदेशिनी' हॉटेलमध्ये सोमवारी पहाटे साडेचारच्या सुमारास ही दुर्घटना घडली. हॉटेलच्या वीजपुरवठा केंद्रात अचानक स्फोट झाल्यानंतर आग लागली. प्राथमिक अंदाजानुसार, विद्युत तारांमध्ये झालेल्या बिघाडामुळे हा स्फोट झाला. त्यावेळी बहुतांश भाविक झोपले होते. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले. सर्वत्र धुराचे लोट पसरले. अनेक जण आपल्या खोल्यांमध्ये अडकले. माहिती मिळताच तारापीठ आणि रामपूरहाट पोलीस ठाण्याचे पोलीस तसेच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी मोठ्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले.

### खर्चासाठी पैसे हवे होते म्हणून 19 वर्षीय तरुणाने रचले स्वत:च्याच अपहरणाचे नाटक

**पुणे :** पुण्यामधून एक अत्यंत धक्कादायक आणि तितकीच चक्रावून टाकणारी घटना समोर आली आहे. हाताला काम नाही, घरून मिळणारे पैसे अपुरे पडतात आणि दैनंदिन खर्च भागत नाही; या आर्थिक विवंचनेतून एका १९ वर्षीय तरुणाने चक्क स्वतःच्याच अपहरणाचा बनाव रचला. कुटुंबीयांना ढसाढसा रडतानाचा व्हिडिओ पाठवून ५ लाख रुपयांची खंडणी मागितली. या प्रकारामुळे उत्तर प्रदेश आणि पुणे अशा दोन राज्यांच्या पोलिसांची मोठी धावपळ उडाली. मात्र, पुणे पोलिसांनी अत्यंत तप्तरता दाखवत तांत्रिक तपासाच्या आधारे अवघ्या काही तासांतच या संपूर्ण बनावाचा पर्दाफाश केला आहे.

## विज्ञानवाद, मानवतावाद सर्व घटकांपर्यंत पोहोचला पाहिजे : डॉ. पी. एस. चंगोले



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** संविधानाची अंमलबजावणी करणे हे प्रत्येक नागरिक, अधिकारी आणि लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. त्यातूनच विज्ञानवाद व मानवतावाद समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचेल, असे प्रतिपादन सत्यशोधक प्रबोधनकार अ‍ॅड. डॉ. पी. एस. चंगोले यांनी केले.

गुरू रविदास सत्यशोधक समाजाच्या वतीने आरक्षण दिन तसेच छत्रपती शाहू महाराज व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थी आणि सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा कीर्ती मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षीय भाषणात डॉ. चंगोले बोलत होते.

डॉ. चंगोले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या दुःखांचे निराकरण करण्यासाठी मोक्याच्या जागा काबीज करण्याचा विचार दिला. विद्यार्थ्यांनी महापुरुषांची पुस्तके वाचून मानवतावादी व विज्ञानवादी दृष्टिकोन अंगीकारावा. प्रश्न विचारण्याची हिंमत, नैतिकता आणि नीतिमत्ता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याकडे पालकांनी लक्ष द्यावे. स्वातंत्र्याला ८० वर्षे पूर्ण झाली असताना आयएएस अधिकाऱ्यांच्या कामाची समीक्षा होणे गरजेचे आहे. अधिकारी किती वेळा कार्यालयाबाहेर पडून विद्यार्थी व नागरिकांच्या समस्या ऐकतात, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

कार्यक्रमाचे उद्घाटन नंदाताई सोनटक्के यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून अनिल निंभोरे, नंदा सोनटक्के, पार्वती चिमकर, साहेबराव दुतोंडे, अंजनाबाई टोंपे, डॉ. प्रा. गीता बरोदे, आशा बरसावने, दुर्गा गतखने व ग. मा. पिंजरकर उपस्थित होते. महिलांची उपस्थिती उल्लेखनीय होती. कार्यक्रमाचे नेटके नियोजन व शिस्तबद्ध आयोजन लक्षवेधी ठरले.

प्रास्ताविक संतोषराव लोखंडे यांनी, सूत्रसंचालन सी. एम. रमने, जी. के. काटकर, प्रियंका पुसे व पूजा पुसे यांनी, तर आभार रमेश डोंगरे यांनी मानले.

## मुंबईच्या आझाद मैदानावर धरणे महानगरपालिका आंदोलक आक्रमक

### मनपा कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन सुरूच

हिंदु प्रकाश वार्ता /अशोक पवार

**परभणी :-** गेले अनेक दिवसापासून थकीत वेतन आणि जीएसटी अनुदान फरकाची रक्कम मिळावी याकरिता दिनांक 10 ऑगस्ट 2026 सोमवारपासून महापालिकेतील कर्मचारी काम बंद आंदोलनावर ठाम असून शासनाचे या आंदोलना कडे दुर्लक्ष होत असल्याने कर्मचारी संघटने कडून 18 ऑगस्ट 2026 पासून मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन या संदर्भात शासनाला सोमवार दिनांक 17 ऑगस्ट रोजी निवेदन देण्यात आले

महापालिका कर्मचाऱ्यांचे मागील पाच महिन्याचे वेतन थकलेले आहे तसेच जीएसटी अनुदान फरकाची रक्कम मिळाली नाही कर्मचारी संघटनेच्या वतीने 10 ऑगस्ट सोमवारपासून आंदोलन सुरू करण्यात आली आहे यामध्ये भीक मागून आंदोलन केस मुंडन पिंडदान कार्यक्रम करत शासनाचे लक्ष वेधण्यात आले

याकडे दुर्लक्ष करत याकडे कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही म्हणून न्याय आपल्या पदरी पाडून घेण्यासाठी व आपल्या हक्काच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी आंदोलनाची भूमिका अंतिम तीव्र केली असून 18 ऑगस्ट पासून मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती अधिकृत सूत्राकडून प्राप्त झाली आहे.

## गणपती पुळे येथील दुर्घटनेतील मयतांच्या वारसांचा मदत वाटप



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** रत्नागिरी जिल्ह्यातील गणपती पुळे येथील दुर्घटनेत बिडकीन ता. पैठण येथील पाच जणांचा मृत्यू झाला होता. या मयतांच्या वारसांचा आज प्रभारी जिल्हाधिकारी अमोल येडगे व आमदार विलास भुमरे यांच्या हस्ते मदतीचे वाटप करण्यात आले. मुख्यमंत्री सहायता निधीतून या मदतीचे वाटप करण्यात आले. या दुर्घटनेत आदित्य संतोष राऊत, अनिकेत बंडू हिवराळे, आनंद राजू नरवडे, सोह्म, आदमाने, यश रामेश्वर कांबळे सर्व रा. बिडकीन यांच्या वारसांनाप्रत्येकी एक लाख रुपये मदतीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले.प्रत्येकी ५ लाख रुपये मदतीचे सानुग्रह अनुदान मयतांच्या वारसांना यावेळी देण्यात आले.

## अलकनंदा आणि मंदाकिनी नद्या धोक्याच्या पातळीजवळ

**डेहराडून, १७ ऑगस्ट :** उत्तराखंडमधील प्रमुख नद्यांची पाणी पातळी सततच्या पावसामुळे वाढल्याने चिंता वाढली आहे. केंद्रीय जल आयोगाने (सीडब्ल्यूसी) सोमवारी सकाळी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, अलकनंदा आणि मंदाकिनी नद्यांची पाणी पातळी धोक्याच्या पातळीजवळ पोहोचली आहे, तर गंगेची पाणी पातळीही वाढत आहे. प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला नदीच्या पाणी पातळीवर सतत लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केंद्रीय जल आयोग (सीडब्ल्यूसी) आणि हवामान विभाग परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

## फिनिक्स इंग्लिश स्कूलचे संस्थापक व मुख्याध्यापिका आठ हजारांच्या लाच प्रकरणी एसीबीच्या जाळ्यात

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या एका कारवाईमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनीच्या फी च्या नावाखाली चार हजार रुपयांची लाच स्वीकारताना करमाड येथील फिनिक्स इंग्लिश स्कूलचे संस्थापक व मुख्याध्यापिकेला रंगेहात पकडण्यात आले आहे.

तक्रारदार यांच्या मुलीचा प्रवेश आरटीई (शिक्षण हक्क अधिनियम) अंतर्गत फिनिक्स इंग्लिश स्कूल, कर्माड येथे झाला होता. नियमानुसार स्कुल बस, वह्या पुस्तके यासारखे ऐच्छिक शुल्क वगळून कोणतीही फी लागू नसताना, शाळा प्रशासनाने सन २०२५ चे चार हजार रुपये व सन २०२६ चे चार हजार रुपये अशी एकूण आठ हजार रुपये फी भरण्यासाठी तगादा लावला होता. ही रक्कम लाच असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली.

या तक्रारीच्या अनुषंगाने १३ ऑगस्ट २०२६ रोजी लाचलुचपत विभागाने केलेल्या पडताळणीमध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका रेणुका रामनाथ कुबेर व संस्थाचालक शिवाजी बाबासाहेब घुले यांनी लाच मागितल्याचे समोर आले. या पडताळणीच्या आधारे १७ ऑगस्ट २०२६ रोजी सापळा रचण्यात आला. करमाड येथील फिनिक्स इंग्लिश स्कूलमध्ये पार पडलेल्या या सापळा कारवाई दरम्यान आरोपी शिवाजी बाबासाहेब घुले यांनी तक्रारदाराकडून चार हजार रुपयांची लाच स्वीकारताच त्यांना आणि मुख्याध्यापिका रेणुका रामनाथ कुबेर यांना ताब्यात घेण्यात आले. सदर प्रकरणाबाबत पोलीस ठाणे करमाड येथे गुन्हा दाखल करण्याची व आरोपींना अटकेची प्रक्रिया सुरू असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक अमोल सोनवणे, पोलीस निरीक्षक प्रतिभा आबुज व त्यांच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसह केंद्रीय मंत्र्यांची भेट

### राज्यातील प्रकल्पांना गती देण्यासाठी चर्चा

**नवी दिल्ली दि. १७ :** महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास आणि दळणवळण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्ली येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय पर्यावरण, वन व हवामानबदल मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन महत्वपूर्ण चर्चा केली.

मुख्यमंत्री फडणवीस दिल्ली दौऱ्यावर असून, त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन महाराष्ट्रातील विविध विकासकामे, प्रलंबित प्रकल्प आणि केंद्र सरकारकडून अपेक्षित सहकार्याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री मोदी यांना राज्यातील प्रशासनाची सद्यस्थिती तसेच केंद्राच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली.

राज्यातील विविध प्रकल्प वेगवेगळ्या टप्प्यांवर असून, त्यांना अधिक गती देण्यासाठी केंद्र सरकारकडून अपेक्षित असलेल्या सहकार्याबाबतचे पत्रही मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्री मोदी यांना दिले. महामार्ग, रेल्वे, मेट्रो, नदीजोड प्रकल्प तसेच उत्तन-विरार कॉरिडॉर यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांबाबत यावेळी चर्चा झाली.

पुणे मेट्रो-३ प्रकल्पाचे काम जवळपास पूर्ण झाले असून सध्या त्याची चाचणी सुरू आहे. टाटा समूहाच्या सहकार्याने उभारण्यात आलेली ही देशातील नवीन धोरणांतर्गत पहिली सार्वजनिक - खासगी भागीदारी पद्धतीची मेट्रो आहे. चाचण्या पूर्ण झाल्यानंतर या प्रकल्पाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना निमंत्रण दिले. प्रधानमंत्री मोदी यांच्यासोबतची भेट अत्यंत सकारात्मक आणि फलदायी झाली. यापूर्वीही महाराष्ट्राने केंद्र सरकारकडे विविध प्रकल्पांसाठी



सहकार्य मागितले असता केंद्राकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. त्याच धर्तीवर राज्यातील विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांना केंद्राच्या सहकार्याने अधिक गती देण्याचा प्रयत्न या दौऱ्यात करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासोबत झालेल्या बैठकीत मुंबई-वाढवण एक्स्प्रेसवे कनेक्टिव्हिटी अर्थात उत्तन-विरार कॉरिडॉर या महत्वाकांक्षी प्रकल्पावर विशेष चर्चा झाली. सुमारे ५५ हजार कोटींच्या या प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीमार्फत (जायका) वित्तीय सहाय्य मिळविण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने सादर केला आहे.

प्रकल्पाचा मोठा आर्थिक आवाका लक्षात घेता, जायकासोबत आणखी एखाद्या बहुपक्षीय वित्तीय संस्थेला सहभागी करून संपूर्ण प्रकल्पासाठी आवश्यक निधी उभारता येईल का, याबाबत केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सकारात्मक पर्याय सुचविला. महाराष्ट्र शासनाने या पर्यायाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, पुढील काळात संबंधित संस्थांशी समन्वय साधून प्रस्ताव पुढे नेण्यात येणार आहे. या प्रयत्नामुळे उत्तन-विरार कॉरिडॉरच्या वित्तीय व्यवस्थेबाबत नवा मार्ग उपलब्ध झाला असून, प्रकल्पाला गती देण्यासाठी पुढील कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे.

केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन महाराष्ट्रातील विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांच्या पर्यावरण व वनविषयक प्रलंबित मंजुरींचा आढावा घेण्यात आला.

## अजिंठा-बुलढाणा महामार्गावर भीषण अपघात; बाप-लेकाचा दुर्दैवी मृत्यू

**अजिंठा प्रतिनिधी :** अजिंठा-बुलढाणा महामार्गावरील मादनी परिसरात मोटारसायकल आणि ट्रॅक्टरचा भीषण अपघात होऊन बाप-लेकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात मोटारसायकलवरील अन्य तिघे जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मोटारसायकल क्रमांक MH 21 BX 5272 वर एकाच कुटुंबातील पाच जण प्रवास करीत होते. मादनी परिसरात मोटारसायकलची ट्रॅक्टरला पाठीमागून जोरदार धडक झाली. या अपघातात नारायण शेषराव शिंदे (वय ३२) आणि त्यांचा मुलगा साई नारायण शिंदे (वय ५) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.



या अपघातात नारायण शिंदे यांची पत्नी ज्योती नारायण शिंदे, मुलगी जानवी नारायण शिंदे आणि मुलगी आर्या नारायण शिंदे हे तिघे जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मृत व जखमी हे सर्व कोसगाव, ता. भोकरदन, जि. जालना येथील रहिवासी आहेत. बाप-लेकाच्या दुर्दैवी मृत्यूने कोसगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिकांनी धाव घेत मदतकार्य केले. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## "शाल जोडे"



# सं पा द की य

## रस्ते-महामार्गांचे जाळे

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक व्यवस्थेला अधिक गतीमान करण्यासाठी आखलेली रूपरेषा राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला नवी दिशा देणारी आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि मुंबईसारख्या प्रमुख शहरांमधील अंतर तासांवरून मिनिटांवर आणण्याचा संकल्प केवळ प्रवासाचा वेळ वाचवणारा नसून, संपूर्ण राज्याच्या प्रगतीची गती वाढवणारा ठरेल. पायाभूत सुविधांचा विकास हा देशाच्या प्रगतीचा कणा मानला जातो आणि त्या दृष्टीने महाराष्ट्रातील रस्ते जाळ्याचे आधुनिकीकरण अत्यंत मोलाचे आहे. विशेषतः पुणे शहर आणि आसपासच्या परिसरातील वाहतूक कोंडीची गंभीर समस्या सोडवण्यासाठी जाहीर केलेला ६० हजार कोटी रुपयांचा निधी ही काळाची गरज आहे. शिरूर ते पुणे, तळेगाव-चाकण-शिक्रापूर आणि खेड ते नाशिक फाटा यांसारख्या अत्यंत व्यग्र मार्गांचे रुंदीकरण आणि आधुनिकीकरण यामुळे आयटी क्षेत्र आणि औद्योगिक पट्ट्याला मोठा दिलासा मिळेल. याशिवाय, अटल सेतू ते बंगळुरू कनेक्टिव्हिटी आणि मुंबई-बंगळुरू पाच तासांत जोडणारा महामार्ग यांसारखे प्रकल्प दक्षिण भारताशी महाराष्ट्राचा व्यापार अधिक सुलभ करतील. रस्त्यांच्या निर्मितीसोबतच त्यांच्या देखभालीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि सॅटेलाईट तंत्रज्ञानाचा वापर करण्याची घोषणा ही प्रशासकीय दृष्टीने आधुनिक पाऊल आहे. यामुळे रस्त्यांवरील खड्डे आणि सुरक्षेच्या त्रुटींची वेळेत डागडुजी होणे शक्य होईल. जागतिक दर्जाच्या सुविधांसाठी टोल द्यावा लागेल, या गडकरी यांच्या स्पष्ट भूमिकेत वास्तवता असली, तरी टोल भरणाऱ्या नागरिकांना खरोखरच निर्धोक आणि खड्डेमुक्त रस्ते मिळतील याची खात्री सरकारने देणे तितकेच आवश्यक आहे. प्रकल्पांची घोषणा होणे ही पहिली पायरी असली, तर वेळेत जमीन अधिग्रहण आणि पारदर्शक अंमलबजावणी करून हे प्रकल्प वेळेत पूर्ण करणे हे खरे आव्हान असणार आहे. हे नियोजित महामार्ग वेळेत पूर्ण झाल्यास महाराष्ट्राच्या वाहतूक व्यवस्थेत क्रांतिकारक बदल घडून येईल, यात शंका नाही.

### माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी सुवर्णसंधी

## पंतप्रधान शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत 31 डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** देशाचे रक्षण करणाऱ्या माजी सैनिकांच्या कुटुंबांना आणि पाल्यांना मोठा दिलासा देणारी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा तसेच युद्ध विधवांच्या पात्र पाल्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता अत्यंत महत्त्वाची असलेल्या 'पंतप्रधान शिष्यवृत्ती योजना' (PMSS) अंतर्गत ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना आर्थिक आधार देणाऱ्या या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी दि. ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत आपले ऑनलाइन अर्ज सादर करणे बंधनकारक असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी केंद्रीय सैनिक बोर्डाच्या अधिकृत www.ksb.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन निर्धारित मुदतीत ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक आहे. अर्ज करताना विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी संकेतस्थळावर एक सविस्तर चेकलिस्ट उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्या चेकलिस्टमध्ये नमूद केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनच अर्ज वेळेत सबमिट करावा, अशा सूचनाही प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

पंतप्रधान शिष्यवृत्ती योजनेच्या अर्जा संदर्भात किंवा प्रक्रियेबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास अथवा अधिक माहिती हवी असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी कार्यालयाच्या ०२४०-२३७०३१३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून सविस्तर माहिती मिळवता येईल. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र माजी सैनिकांच्या पाल्यांनी या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## माजी सैनिकांसाठी सुवर्णसंधी: छत्रपती संभाजीनगर येथे 8 ते 11 सप्टेंबर दरम्यान टेरिटोरियल आर्मीची भरती

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** १३६ इन्फंट्री बटालियन (टेरिटोरियल आर्मी) इकोलॉजिकल, महार यांच्या वतीने माजी सैनिक (पेन्शनर) तसेच स्वेच्छानिवृत्त महिला माजी सैनिकांसाठी विशेष भरती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही भरती दि. ८ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आर्मी भरती मैदान, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार आहे.

या भरती रॅलीमध्ये जेसीओ संवर्गासाठी ४ पदे, तर सोल्जर जीडीसाठी १६२ पदे केवळ महाराष्ट्रातील उमेदवारांसाठी भरली जाणार आहेत. याशिवाय अखिल भारतीय स्तरावर ट्रेड्समनची १५ पदे, सोल्जर क्लर्कची ७ पदे, शेफ कम्युनिटीची २ पदे, वॉशरमनची २ पदे, तसेच हेअर ड्रेसर, मेस कीपर, स्टिवर्ड आणि हाऊसकीपर या प्रत्येक पदासाठी १-१ जागा भरण्यात येणार आहे. भरती संदर्भातील अधिक माहितीसाठी इच्छुक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा किंवा ०२४०-२३७०३१३ या दूरध्वनी क्रमांकावर माहिती घ्यावी. पात्र व इच्छुक माजी सैनिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## रा. स्व. संघाचे जेष्ठ प्रचारक केशवराव नांदेडकरांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सिंहगड रोड, पुणे येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक केशवराव नांदेडकर यांचे अल्पशः आजाराने सोमवारी, १७ ऑगस्ट रोजी पुणे येथील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७९ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, सून, नातवंडे असा मोठा परिवार मराठवाड्यात आहे. नांदेडकर यांनी पूर्वांचल भागात अनेक वर्षे प्रचारक राहून संघाचे कार्य केले. भारतीय मजदूर संघ व नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ बँक वर्कर्सशी संलग्न असलेल्या स्टेट बँक वर्कर्स ऑर्गनायझेशनचे संस्थापक सदस्य होते. त्यांनी आणीबाणी विरोधी सत्याग्रहातही भाग घेतला होता. 'वैकुंठ धाम' मध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी स्टेट बँक ऑफ इंडियाचे अधिकारी, कर्मचारी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा 68 वा वर्धापनदिन 23 ऑगस्टला; ज्येष्ठ सनदी अधिकारी भास्कर मुंढे यांना 'जीवनसाधना पुरस्कार' जाहीर

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापनदिन येत्या २३ ऑगस्ट रोजी अत्यंत उत्साहात साजरा केला जाणार असून, या प्रतिष्ठेच्या सोहळ्याची जय्यत तयारी विद्यापीठ प्रशासनाकडून पूर्ण करण्यात आली आहे. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठ या नावाने या उच्च शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली होती. मराठवाडा आणि परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची द्वारे खुली करून देणाऱ्या या विद्यापीठाचा १४ जानेवारी १९९४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा गौरवशाली नामविस्तार करण्यात आला. स्थापनेपासूनच या विद्यापीठाने शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

यंदाच्या ६८ व्या वर्धापनदिनानिमित्त विद्यापीठ परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य इमारतींसमोरील हिरवळीवर सकाळी ९.०० वाजता दिमाखात विद्यापीठ ध्वज फडविण्यात येईल. त्यानंतर सकाळी १०.०० वाजता विद्यापीठ नाट्यगृहात मुख्य



वर्धापनदिन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यादरम्यान विद्यापीठात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार आणि पारितोषिक वितरण केले जाईल.

या सोहळ्यास नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी भूषविणार आहेत. तसेच प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप आणि प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

विद्यापीठ दिन व उपपरिसर वर्धापन दिन अशा दोन्ही दिवशी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना जीवनसाधना पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यंदाच्या पुरस्काराच्या निवडीसाठी कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी विशेष तज्ज्ञांची शोध समिती स्थापन केली होती. या समितीच्या शिफारशीनुसार विद्यापीठाचा मुख्य जीवनसाधना पुरस्कार ज्येष्ठ सनदी अधिकारी भास्कर शंकरराव मुंढे यांना जाहीर करण्यात आला आहे.

मी मुंढे हे माजी विभागीय आयुक्त असून, त्यांनी ४ जून २०१० ते सप्टेंबर २०१० या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरूपदही यशस्वीपणे भूषविले होते. त्यांच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील दीर्घ व निष्कलंक कार्याचा गौरव म्हणून त्यांना हामानाचा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या सर्व कार्यक्रमांना विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर यांनी केले आहे.

## सरकारी लेखा व कोषागारे विभागातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे आज एकदिवसीय कार्यशाळा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या मार्गदर्शनाखाली सरकारी लेखा व कोषागारे विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी एका एकदिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन मंगळवार, दिनांक १८ रोजी सकाळी साडेदहा वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे.

शासकीय कामात पारदर्शकता आणणे आणि वित्तीय प्रणाली अधिक गतिमान करणे हा या कार्यशाळेचा मुख्य हेतू आहे. यादरम्यान सरकारी लेखा प्रणालीचे बळकटीकरण करणे, आर्थिक व्यवहारांमध्ये आणि नोंदींमध्ये डेटाची अचूकता सुनिश्चित करणे तसेच राज्य सरकारी कर्मचाऱ्यांमधील वित्तीय व लेखाविषयक ज्ञान वाढवून त्यांची कार्यक्षमता उंचावणे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे.

या महत्त्वपूर्ण कार्यशाळेस छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा कोषागार अधिकारी तसेच सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातर्फे करण्यात आले आहे. या कार्यशाळेमुळे विभागातील कामकाजाचा दर्जा उंचावण्यास आणि शासकीय योजनांची वित्तीय अंमलबजावणी अधिक वेगाने होण्यास मदत होणार आहे.

## रेल्वे स्टेशनवरील पाण्याच्या कूलरमध्ये नशेची इंजेक्शन

**कल्याण :** चोरी, नशेखोरांचा उपद्रव आणि विविध गैरप्रकारांमुळे यापूर्वी चर्चेत आलेले कल्याण जंक्शन रेल्वे स्थानक पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरले आहे. स्थानकातील फलाट क्रमांक ४ आणि ५ वर कसारा दिशेकडे असलेल्या वॉटर कूलरच्या केबिनमध्ये नशेसाठी वापरली जाणारी इंजेक्शने आढळून आल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे रेल्वे स्थानकाच्या सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फलाट क्रमांक ४ आणि ५ वरील वॉटर कूलरच्या केबिनमध्ये काही संशयास्पद इंजेक्शने आढळून आली. ही इंजेक्शने नेमकी कोणी आणि कशासाठी वापरली, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, या प्रकारामुळे स्थानक परिसरात नशेखोरांचा वावर किती आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# इंदूर येथील राष्ट्रीय सोयाबीन संशोधन संस्थेत शेतकरी–शास्त्रज्ञ संवाद

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**-भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR) अंतर्गत इंदूर येथील राष्ट्रीय सोयाबीन संशोधन संस्था (NSRI) येथे आज दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी 'सोयाबीन शेती दिन (फिल्ड डे)' आणि शेतकरी–शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी कृषि महाविद्यालय, इंदूरचे अधिष्ठाता डॉ. भरत सिंह तसेच इंदूर जिल्ह्याचे उपसंचालक कृषि श्री. सी. एल. केवडा उपस्थित होते. राष्ट्रीय सोयाबीन संशोधन संस्थेचे संचालक डॉ. के. एच. सिंह यांनी मान्यवरांचे स्वागत करून स्मृतिचिन्ह प्रदान करीत सत्कार केला.

कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील प्रगतिशील शेतकऱ्यांनी आपले अनुभव मांडले. सोयाबीन पिकातील आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादनवाढीसाठी अवलंबिलेल्या पद्धती तसेच विविध कृषि तंत्रज्ञानांच्या वापराबाबत शेतकऱ्यांनी आपले



विचार व्यक्त केले. शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यातील थेट संवादातून क्षेत्रीय समस्या, अनुभव आणि संशोधनाधारित उपाययोजनांवर चर्चा झाली.

यानंतर माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि, शेतकरी व मान्यवरांनी संस्थेच्या संशोधन प्रक्षेत्राला तसेच

कृषि - व्यवसाय विकास प्रक्रिया केंद्राला (अ‍ॅग्री-बिझनेस इन्क्युबेशन सेंटर) भेट दिली. यावेळी संस्थेद्वारे विकसित करण्यात आलेली विविध कृषि उत्पादने, प्रक्रिया तंत्रज्ञान आणि संशोधनाधारित उपक्रमांची पाहणी करून त्याबाबत माहिती जाणून घेण्यात आली.

या कार्यक्रमास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील भा.कृ.अ.प. सोयाबीन संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सुनील उमाटे, वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. सुरनर तसेच 'शेतकरी देवो भव' या भावनेतून सोयाबीन पिकाचे अद्ययावत तंत्रज्ञान जाणून घेण्यासाठी मराठवाड्यातील प्रातिनिधिक प्रगतिशील शेतकऱ्यांची भेट घडवून आणण्याच्या उद्देशाने शेतकरी प्रतिनिधी, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी श्री. मंगेश देशमुख आणि उद्यान पंडित श्री. प्रताप काळे यांच्यासह महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील शेतकरी, कृषि क्षेत्रातील अधिकारी व तज्ज्ञ उपस्थित होते.

शेतकरी, शास्त्रज्ञ आणि कृषि विद्यापीठे यांच्यातील संवाद अधिक बळकट करून संशोधनातील तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा 'फिल्ड डे' कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित/प्रोमकवपरभणी .blogspot.com/2026/08/blog-post_17.html

# वनामकृवित देशभक्तीच्या वातावरणात भव्य तिरंगा रॅली व 'एक शाम देश के नाम' संगीत रजनी संपन्न

## कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या हस्ते तिरंगा रॅलीचा शुभारंभ

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :**-भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या निर्देशानुसार तसेच राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत देशभक्ती, राष्ट्रीय अभिमान, राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रध्वजाबद्दल आदराची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने 'स्वातंत्र्यदिन–२०२६' निमित्त 'हर घर तिरंगा' अभियान देशभर राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालय, राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय कला मंच, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा रॅली तसेच 'एक शाम देश के नाम' या देशभक्तीपर संगीत व नृत्य रजनीचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

तिरंगा रॅलीचा शुभारंभ विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ मुलींच्या वसतिगृहापासून करण्यात आला. रॅलीला सुरवात होताच जोरदार पावसास सुरवात झाली, या बरसत्या पावसातही सुमारे ४७५ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्वयंसेवकांनी १२ × १५० फूट आकाराचा विशाल तिरंगा हातात धरून 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' आणि 'जय जवान, जय किसान'च्या घोषणांनी विद्यापीठ परिसर दुमदुमून टाकला.

पावसाचा जोर वाढल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची व आरोग्याची काळजी घेत माननीय



कुलगुरूंच्या सूचनेनुसार उद्यानविद्या महाविद्यालयाजवळ रॅलीची सांगता करण्यात आली. या रॅलीत कृषी महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय तसेच सामुदायिक विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

सायंकाळी 'एक शाम देश के नाम' या देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत (भापोसे) उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध देशभक्तीपर गीत, संगीत व कला कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य, डॉ. राहुल रामटेके, डॉ. विश्वनाथ खंदारे, डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. नीता गायकवाड, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम, राष्ट्रीय कला मंचचे डॉ. प्रवीण राठोड, श्री. गिरीश कौसडीकर आणि श्रीमती गायत्री लाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये तिरंगा रॅली, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम, प्रतिज्ञा समारंभ, तिरंग्यासोबत सेल्फी, स्वच्छता मोहीम आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत असून, विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यावर भर देण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. धीरज पाथ्रीकर, डॉ. फरिया खान, डॉ. बसलिंगाप्पा कलालबंडी, डॉ. सुभाष विखे, डॉ. प्रवीण घाडगे, डॉ. शंकर पुरी, डॉ. तुकाराम मुंडे, डॉ. संतोष ठोंबरे, श्री. श्रीनिवास भारती, डॉ. स्वर्णा चौधरी तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रध्वजाच्या सन्मानाचा संदेश प्रभावीपणे जनमानसापर्यंत पोहोचविला.

## स्व. छगन आप्पा जाधव यांच्या तिथीप्रमाणे पुण्यतिथी झाड वृक्ष रोप लावून हीच खरी श्रद्धांजली : आयुर्वेदिक डॉ.गोविंद कामटे

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**-कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट गोगलगाव तालुका मानवत जिल्हा परभणी शहर व राष्ट्र जन फाउंडेशन परभणी च्या वतीने स्वर्गीय . छगन आप्पा जाधव यांच्या द्वितीय तिथीप्रमाणे( नागपंचमी) पुण्यस्मरण पुण्यतिथी निमित्त वृक्ष झाड रोप लावून पर्यावरण निसर्ग झाड वृक्ष संगोपन संवर्धन व श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ वाटप आणि गोरगरिबांना खिचडी वाटप करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली प्रथम पुण्यस्मरण ला बेलाचे झाड लावले होते त्याचाही वर्धापन साजरा करण्यात आला आणि यावर्षी स्वर्गीय छगनआप्पा जाधव द्वितीय पुण्यस्मरण पुण्यतिथी हे सौंदड झाड व




आंब्याचे वृक्ष लावून झाडे लावा झाडे जगवा एक पेड पिताजी के याप्रमाणे वृक्ष लागवड करण्यात आली पर्यावरणासाठी व फळा फुलांचे झाड लावा हीच खरी श्रद्धांजली होय यावेळी राष्ट्र जन फाउंडेशन महाराष्ट्राचे सल्लागार आयुर्वेदिक डॉ गोविंद कामटे सेलूकर भाग्यलक्ष्मी नगरचे रहिवाशी सुरेशराव बोरीकर, राम कृष्ण हरी अन्नदान छत्रलय चे मुख्य संकल्पक ह भ प गोविंद महाराज पौढे गुरुजी, जाधव परिवाराचे नातू बालकलाकार रुद्राक्ष आवटे रितेश आवटे पाटील आयोजक कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी अध्यक्ष वृक्षसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांच्यावतीने मागील दोन वर्षापासून वृक्ष झाडे पुण्यतिथी निमित्त आयोजन करून झाडाचे संगोपन केल्या जाते म्हणून प्रत्येकाने जाधव परिवाराचा आदर्श घ्यावा कोणत्याही पुण्यतिथीला झाडे वृक्ष लावला पाहिजे हीच खरी श्रद्धांजली याचा आदर्श घ्यावा असे आव्हान डॉ. गोविंद कामटे यांनी केले

नागपंचमी श्रावण महिन्याचा पहिला सोमवार दिनांक 17 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी दोन वाजता भाग्यलक्ष्मी नगर सत्य महादेव मंदिर सत्य मारुती मंदिर वार्ड क्रमांक 15 वसमत रोड परभणी येथे अशी माहिती राष्ट्रजन फाउंडेशन परभणी अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांना पत्रकाद्वारे माहिती दिली

## जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीसाठी इच्छुक संस्थांना अर्जाचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या सामाजिक, शैक्षणीक आणि आर्थिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्यांकाच्या समस्या तातडीनें सोडविण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि. 15 एप्रिल 2017 अन्वये जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्हयातील अल्पसंख्यांकांसाठी काम करणा-या 3 नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी यांचे नामनिर्देशने शासनास पाठविण्यासाठी जिल्हास्तरावर अर्ज / प्रस्ताव विहित नमुन्यात मागविण्यात येत आहेत. संस्थेचे आयुक्त धर्मदाय किंवा इतर प्राधिकरण यांनी प्रदान केलेले नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेचे घटना व उददेश, सबंधीत संस्था यांच्या सदस्यामध्ये कोणतेही न्यायीक वाद नसल्याबाबत रुपये १०० रु.च्या अर्धन्यायीक कोर्ट फीस स्टॅम्प पेपरवर Notarized प्रमाणपत्र, संस्थेचे प्रतिनिधी हे परभणी जिल्हयाचे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र सर्व कागद पत्रे सोबत जोडावेत.

करीता इच्छुक सदस्यांनी आपले अर्ज दिनांक 25 ऑगस्ट,2026 पर्यन्त जिल्हाधिकारी कार्यालय अल्पसंख्याक कक्ष, जिल्हा नियोजन समिती विभाग येथे विहित नमुन्यात (नांव, पत्ता, जन्म दिनांक, व्यवसाय, शिक्षण, मोबाईल नं. ई-मेल, सामाजिक क्षेत्रात कार्य केलेबाबत माहिती) सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## 19 ऑगस्ट रोजी राजाबाजार येथे प्रथमच पार्श्वनाथ चालीसा पठणाचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** श्री १००८ पार्श्वनाथ भगवान यांच्या मोक्ष कल्याणक महोत्सवानिमित्त तसेच शहरात प्रथमच आचार्य श्री विनम्रसागरजी महाराज यांच्या ससंघ सान्निध्यात पार्श्वनाथ चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. जैन टॅगच्या वतीने 'एक शाम पार्श्वनाथ चालीसा के नाम' या संकल्पनेतून हा भक्तिमय सोहळा बुधवार, १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता राजाबाजार येथील हिराकाका प्रांगणात होणार आहे.

या कार्यक्रमात भाविकांना सामूहिकरित्या पार्श्वनाथ भगवान यांची चालीसा पठण करण्याची संधी मिळणार असून, आचार्य श्री विनम्रसागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. सकल जैन समाजातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, जैन टॅगच्या अध्यक्षा जयश्री लोहाडे, उपाध्यक्ष उज्वला पाटणी, सचिव पूजा झांझरी, कोषाध्यक्ष सीमा बडजाते, संस्थापक अध्यक्षा अनुपमा दगडा, दीपिका बडजाते यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहेत.

# विद्यार्थ्यांच्या नियमित आरोग्य तपासणी करा-आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई :** विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि बालवयातील आरोग्यविषयक समस्या वेळेत निदर्शनास येऊन त्यावर योग्य उपचार मिळावेत, यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (RBSK) शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र संजय श्रीपतराव काटकर यांनी यासंदर्भात शाळा व्यवस्थापन समित्या, ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समित्या तसेच संबंधित यंत्रणांना पत्राद्वारे सूचना दिल्या आहेत.

RBSK अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची वर्षातून दोन वेळा, तर शासकीय व निमशासकीय शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. या तपासणीमध्ये जन्मजात दोष, पोषण व सूक्ष्मपोषक घटकांची कमतरता, विकासातील विलंब व अपंगत्व तसेच विविध आजार या चार प्रमुख बाबींची तपासणी केली जाते.

आरोग्यविषयक समस्या आढळलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार पुढील तपासणी, तज्ज्ञ उपचार तसेच संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामुळे कोणताही विद्यार्थी आरोग्य तपासणीपासून वंचित राहू नये, यासाठी शाळा आणि आरोग्य यंत्रणांनी योग्य समन्वय साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तपासणीच्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती राहावी, तपासणी झाल्याची खात्री करावी आणि तपासणीदरम्यान आढळलेल्या आरोग्यविषयक समस्यांवर आवश्यक संदर्भ सेवा मिळत असल्याची खात्री करावी, अशा सूचना आरोग्य विभागाने दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक बाबींचा वेळोवेळी आढावा घेऊन पालकांचेही आवश्यक सहकार्य घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

"निरोगी बालपणासाठी वेळेवर आरोग्य तपासणी आणि योग्य उपचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. प्रत्येक बालकाची आरोग्य तपासणी होऊन आवश्यक उपचार व संदर्भ सेवा मिळतील, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे," असे आवाहन आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी केले आहे.

## राष्ट्रीय लोकअदालतीचे 12 सप्टेंबर रोजी आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी,:** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार शनिवार, दि. 12 सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्यामार्फत परभणी व हिंगोली जिल्ह्यातील सर्व न्यायालयात करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये सर्व प्रकारची तडजोडपात्र फौजदारी व दिवाणी स्वरुपाची इतर प्रकरणे, भारतीय चलनक्षम दस्तऐवज अधिनियम 1881, बँक वसुली प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, कामगारांची प्रकरणे, कौटुंबिक वाद, भू-संपादन प्रकरणे, वीज (चोरीची प्रकरणे वगळून) व पाणी आकार प्रकरणे, वेतन व भत्त्यांची सेवा विषयक प्रकरणे, आणि महसूल प्रकरणे, तसेच बँकांची वादपूर्व वसुली प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीत न्यायाधीश व वकील यांचे पॅनल आपल्याला मदत करेल. या प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. लोक अदालतीमध्ये प्रकरण तडजोडीने मिटल्यास दाखल कोर्ट फीस नियमानुसार परत मिळते. दि. 12 सप्टेंबर, 2026 रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त तडजोड प्रकरणे ठेवून तडजोडीने निकाली काढण्याचे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश आर.एम सादरणी यांनी केले आहे. न्यायालयात प्रलंबित असलेल्या पक्षकारांची प्रकरणे तडजोडीने मिटविण्याची इच्छा आहे, त्यांच्या विधीज्ञांशी संपर्क करावा. अथवा अधिक माहितीसाठी व आपले प्रकरण दिनांक 12 सप्टेंबर, 2026 रोजी आयोजित लोक अदालतीमध्ये ठेवण्यासाठी आपल्या जवळच्या न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्या कडे संपर्क करावा, असे सचिव बी.एम.काळे यांनी कळविले आहे.

# लाडगाव येथे नवचेतना व आधारशिला मेळावा उत्साहात; बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अंगणवाड्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा संकल्प

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** स्वातंत्र्यदिनाच्या नवचैतन्याने प्रेरित होऊन महिला व बाल विकास विभागाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील लाडगाव, बिट करमाड येथे १५ ऑगस्ट रोजी नवचेतना व आधारशिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्यास माता, बालके, अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

मेळाव्याच्या नियोजनात बिट पर्यवेक्षिका सुनीता परदेशी, जिल्हा समन्वयक अल्ताफ शेख व शोभा शिंदे यांनी भूमिका बजावली. पर्यवेक्षिका अनिता कोडगावकर यांनी सूत्रसंचालन केले. अंगणवाडी सेविका लंका शिंदे, तारा सातपुते, प्रियांका वानखेडे तसेच मदतनीस अंजनी शिंदे, उषा इथ्थर व छाया निकाळजे यांनी सहकार्य केले.

यावेळी महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती मीनाक्षी पवार, उपसरपंच सरला पोफळे, ग्रामपंचायत अधिकारी नानासाहेब चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य रंजना इथ्थर, लक्ष्मी बागल, सोमिनाथ बागल, भगवान पोफळे व संतोष बागल यांच्यासह विविध प्रकल्पांचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महिला व बाल विकास विभागाच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ यांनी नवचेतना व आधारशिला उपक्रमांचे महत्त्व स्पष्ट केले. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यातील प्रत्येक अंगणवाडीत या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन त्यांनी केले. छत्रपती संभाजीनगर प्रकल्प-१च्या बाल विकास प्रकल्प अधिकारी कोमल चव्हाण यांनी नवचेतनेच्या माध्यमातून बालक व मातांचा सक्रिय सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत असल्याचे सांगितले. 'आधारशिला' उपक्रमातून ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना खेळातून शिक्षण, आनंददायी वातावरण आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाची भक्कम पायाभरणी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## जि.प.उच्च प्राथमिक शाळा मागणी येथे स्वातंत्र्य दिन साजरा



**अजिंठा प्रतिनिधी :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मादणी येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. कालभिले यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामसेवक श्री. निंबाळकर उपस्थित होते. कार्यक्रमास उर्दू शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. औरंगजेब पांडे, हाफिज इस्माईल साहेब, मुख्याध्यापक श्री. चोरमले, तसेच शकील सर, जेऊघाले सर, जाधव सर, वाढोकर सर, पाटील सर, कुरैशी सर, श्री लाड,पखन मॅडम, दांदगे मॅडम, यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे सुंदर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला. कार्यक्रमादरम्यान स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान, देशाची एकता आणि अखंडता तसेच विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रगतीसाठी जबाबदार नागरिक म्हणून योगदान देण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. "एकता, अखंडता आणि देशभक्तीचा संदेश देत मादणी शाळेत स्वातंत्र्य दिनाचा उत्साहपूर्ण सोहळा संपन्न झाला."

## मनपा उस्मानपुरा शाळेतील मतदान केंद्रावर एस.एस. बिरारीस यांची 100 टक्के कामगिरी; सैय्यद अशफाक अली यांनी केले कौतुक



**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सघन पुनरिक्षण (Special Intensive Revision – SIR) प्रक्रियेंतर्गत १०८ औरंगाबाद (पश्चिम) विधानसभा मतदारसंघातील भाग क्रमांक १०८/२२३, मनपा उस्मानपुरा शाळेतील मतदान केंद्रावर मतदार यादी शुद्धीकरण व पडताळणीचे काम प्रभावीपणे करण्यात आले. या प्रक्रियेत बीएलओ म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती एस.एस. बिरारीस यांनी अत्यंत जबाबदारीने काम करत १०० टक्के यशस्वी कामगिरी केली आहे.

मनपा उस्मानपुरा शाळेतील मतदान केंद्रावर झालेल्या बीएलओ–बीएलए बैठकीत मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, मॅपिंग न झालेले मतदार शोधणे, प्रत्यक्ष भेटीदरम्यान न सापडलेल्या मतदारांची पडताळणी करणे तसेच अनुपस्थित, कायमस्वरूपी स्थलांतरित, मृत आणि दुबार मतदारांची माहिती तपासण्याबाबत चर्चा करण्यात आली. भाग क्रमांक १०८/२२३ मध्ये एकूण १,३८२ मतदार आहेत. उपलब्ध नोंदीनुसार १,३८२ मतदारांचे ईएफ संकलन पूर्ण करण्यात आले असून, ८६३ मतदारांचे ईएफ डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. एसआयआर प्रक्रियेदरम्यान आवश्यक पडताळणी व पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

प्राथमिक शिक्षिका असूनही बीएलओची जबाबदारी प्रभावीपणे श्रीमती एस.एस. बिरारीस या मनपा उस्मानपुरा शाळेत प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची आपली नियमित जबाबदारी सांभाळतानाच त्यांनी निवडणूक आयोगाने सोपविलेली बीएलओची महत्त्वाची जबाबदारीही अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडली.

# नागपंचमीनिमित्त 'सर्प – समज, गैरसमज आणि विज्ञान' जनजागृती कार्यक्रम

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



उरण रायगड

नागपंचमीनिमित्त सर्पांविषयीचे समज-गैरसमज दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून जनजागृती करण्याच्या उद्देशाने फ्रेंड्स ऑफ नेचर (FON) सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था, चिरनेर-उरण, रायगड (महाराष्ट्र) यांच्या वतीने 'सर्प – समज, गैरसमज आणि विज्ञान' या विषयावर तीन ठिकाणी विशेष जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत रयत शिक्षण संस्थेचे मॉडर्न स्कूल, वाशी, नवी मुंबई येथे व्याख्याते तुषार म्हात्रे, कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन येथे जयवंत रामदास ठाकूर, तर पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोन येथे निकेतन रमेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात सर्पांचे पर्यावरणातील महत्त्व, सर्पांविषयी प्रचलित गैरसमज व अंधश्रद्धा, सर्पदंशाची प्रतिबंधात्मक काळजी, योग्य प्रथमोपचार तसेच सर्प आणि मानव यांच्यातील सहजीवन याबाबत वैज्ञानिक माहिती देण्यात आली. सर्पांविषयीची अनावश्यक भीती दूर करून त्यांचे संवर्धन आणि मानवी सुरक्षितता यांचा समतोल साधण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

हा उपक्रम फ्रेंड्स ऑफ नेचर (FON) संस्थेच्या 'शून्य सर्पदंश मृत्यू अभियान' या व्यापक जनजागृती उपक्रमाचा भाग असून, संस्थेच्या Snakebite Action Team (S.A.T.) मार्फत सर्पदंशाच्या घटना कमी करण्यासाठी तसेच सर्पदंशामुळे होणारे मृत्यू टाळण्यासाठी वैज्ञानिक माहिती समाजापर्यंत पोहोचविण्यात येत आहे.

या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी संबंधित शाळांचे मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. स्थानिक स्कूल समिती सदस्यांसह FON संस्थेचे S.A.T. स्वयंसेवक हृषिकेश म्हात्रे आणि जय गायकवाड यांचीही यावेळी उपस्थिती होती. नागपंचमीच्या पारंपरिक सणाला वैज्ञानिक जनजागृतीची जोड देत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून 'सर्प वाचवा, अंधश्रद्धा दूर करा आणि सर्पदंशाने होणारे मृत्यू थांबवा' असा महत्त्वपूर्ण संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

# साई ट्रस्ट च्या ज. ने. पोर्ट विद्यालयात स्वातंत्र्यदिन संपन्न

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



उरण रायगड

साई ट्रस्ट च्या जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयात स्वतंत्र भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि राष्ट्रभक्तीने साजरा करण्यात आला.शाळेच्या बालोद्यान, प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील २१०० विद्यार्थी व त्यांचे पालक,शाळेच्या सर्व शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या अथक

परिश्रमामुळे हे अभूतपुर्व यश प्राप्त झाले आहे. या यशात संस्थेचे अध्यक्ष व शाळेचे चेअरमन नरसू पाटील, मुख्याध्यापक रमाकांत गावंड, श्रीम.वैशाली बोरचटे, गिरीश पाटील, भुषण जाधव, अंकुश जोगळे यांच्या दूरदर्शी नियोजनामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे कलाशिक्षक मिलिंद ठाकूर यांनी उत्तमप्रकारे केले. शाळेचे संगीत शिक्षक पंडित गणेश बंडा, श्रीम. स्वप्नजा म्हात्रे, श्रीम. भारती कांबळे आणि विद्यार्थी संचाने

राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, आणि देशभक्तीपर गीते सुमधुर स्वरांनी सादर केली. वर्गशिक्षिका श्रीम.वंदना कपूर,श्रीम.प्रिती कडू यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. किशोर म्हात्रे यांनी सुंदर फलक लेखन केले होते. श्रीम.आश्रया शिवकर,श्रीम.योगसाधना पाटील,श्रीम.उज्ज्वला तांडेल,श्रीम.कीर्ती शिरसाट यांनी उत्तम सजावट केली. तसेच मान्यवरांच्या स्वागताच्या प्रसंगी खूप मेहनत घेतली. शाळेचे आदर्श क्रीडाशिक्षक मनोहर टेमकर यांनी ध्वजारोहण संचलन आणि कवायत संचलन उत्तमप्रकारे सादर केले.शाळेच्या परंपरेनुसार प्रमुख पाहुणे म्हणून सन्मानाने निमंत्रित केलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उरण तालुक्यात प्रथम आणि रायगड जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत झळकलेल्या गुणवंत आणि कीर्तीवंत विद्यार्थी कु. नमित वाघावले, कु. आयुष पाटील, कुमारी-हंसिका बंडा, कु. आदर्श डिगे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या राष्ट्रीय सोहळ्यासाठी पालक संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष योगेश तांडेल, माजी विद्यार्थी संघटनेचे कार्याध्यक्ष प्रतिक भोईर, शिक्षक नेते आर. के. म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षिका श्रीम. भारती कांबळे, शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी श्रीम. माधुरी कडू, शाळेच्या पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष आणि तमाम पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील , शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक नेते रमाकांत गावंड आणि प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी तुरुंगवास भोगलेल्या, आपल्या प्राणाचे बलिदान देणारे महान देशभक्त, नेते,क्रांतिकारक यांनी देशासाठी केलेल्या त्यागाचे, कार्याचे स्मरण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. तसेच देशाच्या विज्ञान, तंत्रज्ञान,लोकशाही आणि आर्थिक विकास अशा सर्वागीण विकासाबाबत आणि शाळेच्या शैक्षणिक, सामाजिक , सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील गौरवशाली पंरपरेबाबत आपले विचार मांडले.

या कार्यक्रमांतर्गत देशभक्तीपर गीते आणि घोषणा देत जे. एन. पी. ए. वसाहतीत भव्य-दिव्य प्रभातफेरी

## सोयगाव तालुक्यातील निंबायती येथे शादीखाना इमारतीचे लोकार्पण; सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.१७ ऑगस्ट

आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते निंबायती येथे शादीखाना इमारतीचे लोकार्पण तसेच सामाजिक सभागृहाच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे होते.आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने अल्पसंख्याक विभागाच्या माध्यमातून निंबायती येथे उभारण्यात आलेल्या शादीखाना इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. या इमारतीमुळे गावातील नागरिकांना विविध सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त सुविधा उपलब्ध होणार आहे.तसेच निंबायती येथे सामाजिक सभागृहाच्या उभारणीसाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी आपल्या स्थानिक विकास निधीतून निधी उपलब्ध करून दिला आहे.या निधीतून गावात सामाजिक सभागृहाचे काम करण्यात येणार असून,त्यामुळे ग्रामस्थांना विविध सामाजिक,सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी हक्काची सुविधा उपलब्ध होणार आहे.

याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर,माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा शिवसेना सिल्लोड तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, पंचायत समिती सदस्य सविताताई सोपान गावंडे, शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण, सिल्लोड-सोयगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सतीश ताठे, नगरसेवक हर्षल काळे,ग्रामस्थ व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ रंगकर्मी, लेखक व पुरोहित सुधाकर ठाकूर यांचे निधन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



उरण रायगड

उरण तालुक्यातील खोपटे बांधपाडा परिसरातील हसमुख, मनमिळावू आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व कैलासवासी सुधाकर केशव ठाकूर यांच्या निधनाने सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि क्रीडा क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

सुधाकर ठाकूर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपल्या कुटुंबाला उत्तम संस्कार व शिक्षण दिले. गिरोबा देवावर त्यांची नितांत श्रद्धा होती. श्रीक्षेत्र खोपटे ग्रामदेवता गिरोबा देवाची आरती त्यांच्या लेखणीतून साकारली असून, १९८०च्या दशकात स्थापन झालेल्या गिरोबा देव स्फूर्ती मंडळाच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता.रंगभूमीशीही त्यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. त्यांच्या लेखणीतून अनेक सामाजिक व विनोदी नाटके साकारली आणि सिद्धेश्वर नाट्य मंडळाच्या माध्यमातून ती रसिकांसमोर आली. उत्तम डावखुरे फलंदाज व हॉलीबॉलपटू म्हणूनही त्यांनी क्रीडा क्षेत्रात ठसा उमटवला.

पुरोहित म्हणून त्यांनी शास्त्र, मंत्र व पुराणांचा सखोल अभ्यास करून अभिषेक, विवाह, गणेशपूजन, वास्तुपूजन, सत्यनारायण पूजा व मंदिरातील विविध धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पाडले. त्यांच्या ज्ञानामुळे आणि भक्तिभावामुळे अनेकांच्या मनात त्यांच्याबद्दल आदराचे स्थान निर्माण झाले होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, तीन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने ठाकूर कुटुंबासह बांधपाडा परिसराची मोठी हानी झाली आहे.

# ब्लु माउंटेन प्री स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**बिडकीन प्रतिनिधी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचालित ब्लु माउंटेन प्री स्कूलमध्ये १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास शाळेचे संस्थापक सतीश तोतला, शाळेच्या संचालिका सविता तोतला, शाळेतील शिक्षिका व कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या पूजनाने करण्यात आली. शाळेचे संस्थापक सतीश तोतला व संचालिका सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत भारताचा स्वातंत्र्य संग्राम, देशासाठी बलिदान देणारे स्वातंत्र्यसैनिक, तिरंग्याचे महत्त्व आणि देशाप्रती असलेली आपली जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत माहिती दिली. लहान वयातच विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजावी, हा कार्यक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी पी.टी.चे प्रात्यक्षिक, देशभक्तीपर नृत्य, पोवाडा, भाषणे तसेच भारतीय देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला उपस्थित पालक व शिक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली.स्वातंत्र्य दिनाचे विशेष आकर्षण म्हणजे काही विद्यार्थी महापुरुषांच्या वेशभूषेत शाळेत उपस्थित झाले होते. विविध महापुरुषांच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याची ओळख करून देत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देशाच्या इतिहासाची आणि महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्याची ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. संपूर्ण शाळेचा परिसर तिरंगी रंगांनी आणि देशभक्तीपर वातावरणाने भारून गेला होता. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा उत्साह, सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग आणि राष्ट्रप्रेमाची भावना यामुळे स्वातंत्र्य दिनाचा सोहळा संस्मरणीय ठरला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा; जलदूत बनून पाण्यासाठी चालूया

## जलसंधारण दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राज्यातील नागरिकांना आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** आपला महाराष्ट्र समृद्ध आणि हिरवागार असावा, हे आपल्या सर्वांचे स्वप्न आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी संपूर्ण राज्यात 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना जलसंधारणाच्या या जनजागृती अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

२१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले आहे. या वॉकेथॉनमध्ये तरुणांसह सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.

जलसंधारणाचा संदेश प्रभावीपणे युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी रील्स स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत युवा पिढीने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.



या ऐतिहासिक जलसंधारण मोहिमेत सहभागी होण्यासाठी राज्य शासनाच्या जाहिराती तसेच समाजमाध्यमांवर उपलब्ध असलेला अधिकृत क्यूआर कोड स्कॅन करून नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा, असे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

जलसंधारण ही केवळ राज्य शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक असलेली लोकचळवळ आहे. त्यामुळे या जनजागृती अभियानात प्रत्येकाने सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.

"चला, एकत्र येऊया, जलदूत बनून पाण्यासाठी चालूया. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या मूलमंत्राला जगवूया," असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयम

## योजनेंतर्गत वसतीगृह प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी व वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वंयम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याकरिता **https**://hmas.mahait.org या पोर्टलवर दि. 12 ऑगस्ट, 2026 पासून टॅब उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयात व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा लाभ घेण्याकरीता **https**://hmas.mahait.org या शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावेत. तसेच आधार व स्वयंम योजनेअंतर्गत नुतनिकरणाचे अर्ज भरण्याबाबत स्वतंत्रपणे सुचना देण्यात येणार आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांनीच अर्ज सादर करावेत. असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

# मिशन लक्षवेध अंतर्गत विविध क्रीडा स्पर्धा संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत 'मिशन लक्षवेध' योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून ऑलिम्पिक स्तरावर खेळल्या जाणाऱ्या १२ खेळ प्रकारांवर लक्ष केंद्रित करण्याचे शासनाचे धोरण आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातील खेळ व खेळाडू, क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडाविषयक पायाभूत सुविधा, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा वैद्यकशास्त्र, खेळाडूंना प्रोत्साहन व पुरस्कार, करिअर मार्गदर्शन तसेच




खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी-विदेशी संस्थांचे सहकार्य अशा विविध घटकांचा विकास करण्यात येणार आहे.

ही योजना त्रिस्तरीय असून राज्यस्तरावर हाय परफॉर्मन्स सेंटर, विभागीय स्तरावर स्पोर्ट्स एक्सलन्स सेंटर आणि जिल्हास्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

मिशन लक्षवेध योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील क्रीडा प्रतिभा विकास केंद्रामार्फत ॲथलेटिक्स, कुस्ती आणि टेबल टेनिस या तीन क्रीडा प्रकारांमध्ये प्रत्येकी २० खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. जिल्हास्तरावरील या केंद्रांद्वारे पात्र व गुणवंत खेळाडूंना संबंधित खेळामध्ये प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

टेबल टेनिस खेळाच्या प्रशिक्षणाचे उद्घाटन उत्तम लटपटे यांनी केले. ॲथलेटिक्स खेळाच्या प्रशिक्षणाचे उद्घाटन आण्णा डिघोळे यांनी केले, तर कुस्ती खेळाच्या प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी केले.

यावेळी धनंजय बनसोडे, पुरोहीत सर, राजू डिघोळे, संजय मुंढे, कल्याण पोले, सुयश नाटकर, रोहन औढेकर, गजानन तुडमे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुयश नाटकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, तालुका क्रीडा अधिकारी कल्याण पोले, क्रीडा अधिकारी सुयश नाटकर, क्रीडा अधिकारी रोहन औढेकर, कनिष्ठ लिपिक गजानन तुडमे, धीरज नाईकवाडे, योगेश आदमे आणि प्रकाश पंडित यांनी मोलाचे सहकार्य केले.

# हत्तीरोगाचा शोध घेण्यासाठी जिल्ह्यात विशेष मोहीम; 31 ऑगस्टपर्यंत घरोघरी तपासणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, दि. १७ :** 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत जिल्ह्यात दि. १६ ते ३१ ऑगस्टदरम्यान विशेष हत्तीरोग शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, आशा स्वयंसेविका व आरोग्य सेवकांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन नागरिकांची तपासणी, जनजागृती आणि संशयित रुग्णांचा शोध घेतला जात आहे. हत्तीरोगाचे वेळीच निदान करून उपचार आणि रुग्ण व्यवस्थापनाला गती देणे, हा मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. हत्तीरोग अधिकारी



डॉ. वैशाली पाटील, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. राहुल चव्हाण आणि सहाय्यक संचालक डॉ. रेखा भंडारी यांच्या समन्वयाने मोहिमेची अंमलबजावणी होत आहे.

उपलब्ध नोंदीनुसार जिल्ह्यात ४७, तर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रात २२, असे एकूण ६९ हत्तीपाय रुग्ण नोंदले आहेत. यापैकी जिल्ह्यातील ३९ आणि महानगरपालिका क्षेत्रातील १९, असे एकूण ५८ रुग्ण ग्रेड-३ व त्यावरील श्रेणीतील आहेत. या ५८ रुग्णांची तपासणी पूर्ण झाली असून त्यांना प्रमाणपत्रही देण्यात आले आहे. सर्व हत्तीपाय रुग्णांना मागील वर्षीच विकृती व्यवस्थापन व अपंगत्व प्रतिबंधासाठी एमएमडीपी किट देण्यात आले आहे.

हत्तीरोग हा फायलेरियल परजीवीमुळे होणारा आणि डासांमार्फत पसरणारा आजार आहे. संसर्ग झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात अनेकदा स्पष्ट लक्षणे दिसत नसल्याने तपासणीला विशेष महत्त्व आहे. दीर्घकाळ सूज राहिल्यास हत्तीपायाची विकृती निर्माण होऊ शकते. मोहिमेत पूर्वी निदान झालेल्या रुग्णांचा पाठपुरावा, आवश्यक उपचार, एमएमडीपी सेवांबाबत मार्गदर्शन आणि संशयित रुग्णांना पुढील तपासणीसाठी आरोग्य संस्थांकडे संदर्भित केले जाणार आहे. नागरिकांनी घराभोवती पाणी साचू देऊ नये, डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करावीत, परिसर स्वच्छ ठेवावा आणि रात्री मच्छरदाणीचा वापर करावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. पाय, हात अथवा शरीराच्या अन्य भागाला दीर्घकाळ सूज असल्यास स्वतःहून उपचार न करता जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा. घरोघरी तपासणीसाठी येणाऱ्या आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविकांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाने केले आहे.

# स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला 'माँ तुझे सलाम'ने जागवला राष्ट्रप्रेमाचा हुंकार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला लायन्स क्लब छत्रपती संभाजीनगर वाळूजच्या वतीने आयोजित 'माँ तुझे सलाम' या देशभक्तिपर संगीतमय कार्यक्रमाने तापडिया नाट्यमंदिर राष्ट्रप्रेमाच्या सुरांनी भारून गेले. शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी झालेल्या या कार्यक्रमाला २५० हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली.

नीरज वैद्य, अरविंद पिंगळे, संगीता भावसार, संदीप डोलारकर आणि विनय याडकीकर यांनी मराठी व हिंदीतील लोकप्रिय देशभक्तिपर गीतांची सुरेल मैफल सादर केली. संगीत




संयोजन राजेश भावसार यांनी केले, तर संकल्पना व निर्मिती विनय याडकीकर यांची होती. स्वातंत्र्यसैनिकांचे त्याग, बलिदान आणि देशासाठी केलेल्या संघर्षाचे स्मरण करून देणाऱ्या गीतांनी रसिक मंत्रमुग्ध झाले. 'हर घर तिरंगा' अभियानाच्या भावनेतून आयोजित या कार्यक्रमातून राष्ट्रध्वजाप्रती सन्मान, राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि देशाप्रती कर्तव्याची भावना दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर ला. राजेश राऊत, ला. मोरेश्वर कुलकर्णी, ला. चारूलता कुलकर्णी, ला. प्रदीप गर्गे, ला. शेखर तोरणेकर, ला. जयदीप घुगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. क्लबचे अध्यक्ष ला. अशोक गुरनाळे, सचिव ला. बाबासाहेब निकम, कोषाध्यक्ष ला. दयाल डिडोरे यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# स्नेहनगरमध्ये सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.17, :** नगरपरिषद सिल्लोड अंतर्गत शहरातील स्नेहनगर येथे करण्यात येणाऱ्या सिमेंट काँक्रीट रस्ता कामाचे भूमिपूजन माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ.सत्तार होते.




कार्यक्रमास उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा नगरसेवक नंदकिशोर सहारे, नगरसेवक अकिल वसईकर, शेख इम्रान, नूर मोहंमद कुरेशी, शेख बाबू, शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार, कृउबा समितीचे संचालक शेख जावेद, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक शंकरराव खांडवे, राजेंद्र ठोंबरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, शेख सलीम हुसेन, मोईन पठाण, भावराव दुधे, जगन्नाथ कुदळ, फहिम पठाण, तुषार चौधरी, सखाराम आहिरे, सुनील बन्सोड, मुश्ताक देशमुख, रुग्णकल्याण समितीचे सदस्य हाजी मोहंमद हनिफ आदी उपस्थित होते. तसेच उपमुख्याधिकारी अजगर पठाण, प्रकल्प समन्वयक देवेंद्र सूर्यवंशी, प्रशासकीय अधिकारी जुबेर सिद्दीकी, मधुकर साळवे, ओंकार महाजन, सतीश सूर्यतळे, आकाश बन्सोड, अय्युब बाबा यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी शहरातील नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषदेमार्फत विविध विकासकामांना गती देण्यात येत असल्याचे सांगितले.

# नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी समस्या निवारण बैठक संपन्न

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**खुलताबाद प्रतिनिधी :** आ प्रशांत बंब , तहसीलदार श्री. संतोष गुट्टे व पोलीस निरीक्षक . प्रशांत महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज तहसील कार्यालयात समस्या निवारण बैठक आयोजित करण्यात आली होती

या बैठकीस तालुक्यातील विविध गावांमधून तब्बल १२५ नागरिक नी आपल्या समस्या घेऊन उपस्थित होते. तहसील कार्यालय, पंचायत समिती, गिरीश स्थान नगर परिषद खुलताबाद कृषी विभाग, महावितरण, आरोग्य विभाग, शेत रस्ते व पानंद रस्ते, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मुख्यालयी राहणे,




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेतील अडचणी तसेच इतर विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

नागरिकांनी आपल्या तक्रारी व समस्या लेखी स्वरूपात आ . प्रशांत बंब साहेब यांच्याकडे सादर केल्या. संबंधित विभागांना पत्र देऊन पुढील एक महिन्यात सर्व तक्रारींचा आढावा घेऊन योग्य तो खुलासा व निवारण करण्यात येईल, असे आश्वासन आमदार प्रशांत बंब यांनी यावेळी दिले.

या बैठकीस जिल्हा परिषद सदस्य सौ. प्रतिक्षा कापसे, सौ. रेखाताई चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, जिल्हा सरचिटणीस विकास कापसे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष एल. जी. गायकवाड, तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, नगराध्यक्ष आमेर पटेल, उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ, शहराध्यक्ष परसराम बारगळ, , पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे, संजय खंडागळे, नारायण बरडे, किशोर नलावडे, अमोल गवळी, , बंडू शिंदे, अनिल करपे, भागचंद जोनवाल, आजिनाथ जाधव, रज्जाक पठाण, गोपाल वर्मा, कृष्णकांत व्यवहारे, भागवत काळे, दत्तु कराळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, विभागप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या समस्या ऐकून घेऊन त्या मार्गी लावण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयातून ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.

# जिल्हा बँक संचालकपदी दुसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल प्रभाकर (आबा) काळे यांचा सत्कार; घोसला येथे आ.अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार सोहळा

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव, दि.१७ ऑगस्ट

तालुक्यातील घोसला येथे सोयगाव पंचायत समिती सदस्या सविताताई सोपान गावंडे मित्र मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा बँकेचे संचालक प्रभाकर (आबा) काळे यांची दुसऱ्यांदा संचालकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आमदार अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते प्रभाकर (आबा) काळे यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच आमदार सत्तार यांनी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या विविध अडीअडचणी जाणून घेतल्या.ग्रामस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या कार्यक्रमात सुनीताबाई बावस्कर व सुनील रहाटे या दिव्यांग बंधू-भगिनींना त्यांना पाणी आणणे सहज सोपे होईल असे पाण्याच्या गट्टूचे वाटप आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर,माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा शिवसेना सिल्लोड तालुकाप्रमुख केशवराव पा.तायडे,पंचायत समिती सदस्य सविताताई सोपान गावंडे,शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण,सिल्लोड-सोयगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सतीश ताठे,नगरसेवक हर्षल काळे,सलीम पठाण, राजमल पवार,श्रावण राठोड,डॉ.लतीफ देशमुख यांच्यासह गणेश गवळी,माजी सभापती चंद्रकांत पाटील,उत्तम बावस्कर,ज्ञानेश्वर हिवरे,सुखदेव पाटील,भिका बावस्कर, समाधान गावंडे,ज्ञानेश्वर गवळी,अमोल बोरसे,दिनेश पाटील, गणेश तायडे,आबा वाघमारे आदीसह ग्रामस्थ व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिंतूरमध्ये प्रथमच 'स्केटिंग तिरंगा रॅली'



**जिंतूर :** स्वातंत्र्य दिनानिमित्त जिंतूरच्या इतिहासात प्रथमच आरटीएसए स्केटिंग कोच पुष्कर गजानन डहाके यांच्या पुढाकारातून 'स्केटिंग तिरंगा रॅली' उत्साहात पार पडली. अण्णाभाऊ साठे चौकातून सुरू झालेल्या या रॅलीत ५० हून अधिक स्केटिंगपटूंनी तिरंगा हातात घेऊन देशभक्तीच्या घोषणा देत सहभाग घेतला.

हेल्मेट व स्केटिंग गणवेशातील विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे तहसील कार्यालय गाठले. तेथे तिरंग्याला सलामी देण्यात आली. नायब तहसीलदार प्रशांत राखे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगराध्यक्ष प्रताप देशमुख, किशोर जाधव, मुन्ना कुरेशी, नगरसेवक अथर, लखुजी जाधव, विनोद पाचपिल्ले, डॉ. अनिल गायकवाड, तलाठी वाकळे आदी मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी प्रशांत राखे यांनी स्केटिंगमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संतुलन, आत्मविश्वास व व्यक्तिमत्त्व विकास घडतो, असे सांगत उपक्रमाचे कौतुक केले. डॉ. गजानन डहाके यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार गजानन कुरे यांनी मानले. पालक, मित्रमंडळी व जिंतूरकरांच्या सहकार्यामुळे रॅली यशस्वी झाली. या उपक्रमामुळे शहरात देशभक्तीबरोबरच क्रीडा संस्कृतीलाही नवी ऊर्जा मिळाली.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911